JNIESTR NANDED,ATARI PUNE, ICAR NEW DELHI

भाकृअनुप ICAR

# कृषि विज्ञान केंद्र
## नांदेड-१

# ५% निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत



प्रा.माणिक कल्याणकर
पिक संरक्षण तज्ञ
मो. 9421569640

डॉ.देविकांत अ.देशमुख
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
मो. 9423140598

डॉ.गिरीष देशमुख
कृषि विस्तार तज्ञ

पत्ता : कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी,पूर्णा रोड,नांदेड.
Email : kvk_nanded@yahoo.co.in
www.kvknanded.com

## ५% निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत

एक एकरची फवारणी करीता लागणारे साहित्य

०१. ५ किलो वाळलेल्या निंबोळ्या
०२. १०० लिटर पाणी
०३. २०० ग्रॅम कपडेधुण्याचे पावडर
०४. वस्त्र गाळ करण्याचे कापड
०५. १०० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी



पिकलेल्या निंबोळ्या खाली पडल्यानंतर गोळा करून सावलीत वाळवून साठवणूक करा



↓

फवारणीच्या एक दिवस आगोदर ५ किलो पूर्ण वाळलेल्या निंबोळ्याची भुकटी (पावडर) तयार करा. ९ लिटर प्लास्टीकच्या बादतीत पाण्यात रात्रभर भिजत ठेवावी. निंबोळी भिजवितांना बादली व्यवस्थीत झाकुन ठेवावी. त्याच बरोबर निंबोळी पावडर भिजवण्यासाठी थंड पाणी वापरावे.



↓

दुसऱ्या दिवशी सकाळी पाण्यात भिजत ठेवलेली भुकटी वस्त्रगाळ करून द्रावण गाळुन घ्या.



↓

नंतर १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम वॉशिंग पावडर (धुण्याचा सोडा) किंवा साबणाचा चुरा मिक्स करून घ्या. यामुळे द्रावण पिकाच्या पानावर चिटकुन राहण्यास मदत होते.

↓

हे वॉशिंग पावडरचे द्रावण वस्त्रगाळ केलेल्या ९ लिटर द्रावणात मिसळून (ढवळुन)एकत्र करून घ्या.हे १० लिटरचे द्रावण तयार होईल. एका टाकीमध्ये ९० लिटर पाणी घ्या.व वरील १० लिटरचे द्रावण त्यामध्ये मिक्स करून घ्या आणि ढवळा. अशा प्रकारे ५% निंबोळी अर्क तयार होईल.





## किड परावर्तक

निंबोळी अर्क :

निंबोळी अर्क म्हणजे कडूलिंब या झाडाच्या बियांपासून (निंबोळ्या) काढलेला अर्क होय. कडूलिंबाच्या झाडाला फेब्रुवारी ते मार्च महिन्यात मोहोर येतो आणि मे महिन्याच्या शेवटी निंबोळ्या पक्व होऊन त्यांचा सडा झाडाखाली पडतो.

या निंबोळया गोळा करून त्यातील दगड धोंडे आणि खडे वेगळे करून पोत्यामध्ये वर्षभर साठविता येतात. साठविलेल्या निंबोळीपासून वर्षभरात गरजेप्रमाणे निंबोळीचा अर्क तयार करण्यासाठी,तसेच निंबोळी पेंड तयार करण्यासाठी वापर करता येतो.

कडूलिंबाच्या झाडामध्ये असलेले 'अॅझाडिराक्टीन' किटकनाशकाचे काम करते. या घटकाचे प्रमाण याच्या बियांमध्ये जास्त प्रमाणात असते,तर ते पानामध्ये कमी प्रमाणात असते. शेतीमध्ये निंबोळीला खुप महत्व आहे.निंबोळीचा किटकनाशक बनविण्यासाठी उपयोग होतो.

निंबोळीत असणारा 'अॅझाडिराक्टीन' हा घटक किटक, सुत्रकृमी विषाणू आणि बुरशी यांचे नियंत्रण करण्यासाठी उपयोग होतो. फक्त चावुन खाणारे व रस शोषणाऱ्या किडींवर परिणाम करते.



## अंडीनाशक

निंबोळी अर्क वापरण्याचे फायदे :

०१. संपूर्णपणे नैसर्गिक स्त्रोतांपासून तयार होत असल्यामुळे खर्च अतिशय कमी येतो.


०२. निंबोळी अर्काच्या फवारणीमुळे रस शोषक किडींचा प्रादुर्भाव कमी होतो.

सर्व प्रकारच्या पिकांवर १५ दिवसांच्या अंतराने नियमीत फवारणी घेतल्यास रस शोषक किडींचा जीवन चक्रात अडथळा येऊन किडींचे नियंत्रण होते.

०३. किडींच्या जीवन चक्रामध्ये पतंग वर्गीय किडींना अंडी घालण्यापासून परावृत्त केले जाते. तसेच रस शोषक किडींचे देखिल अंडी घालण्याच्या नैसर्गिक क्रियेमध्ये अडथळा येतो. त्यामुळे एकूणच किडींच्या जीवन चक्रामध्ये अडथळा येतो.

०४. नैसर्गिक घटक असल्या कारणाने कोणत्याही प्रकारचे रासायनिक अंश राहत नाही. यामुळे सेंद्रीय शेतीमध्ये वापर करण्यास सुलभ आहे. निर्यातीसाठीच्या भाजीपाला पिकामध्ये देखील याची फवारणी फायदेशीर ठरते.





## पिक संवर्धक   रासायनिक अंश विरहित

०५. किटकनाशकांसोबत देखील वापरता येत असल्या कारणाने तसेच एकात्मीक किड नियंत्रण पध्दतीमध्ये वापरण्यास अगदी सोपे असे हे नैसर्गिक किडनाशक आहे.

०६. पांढरी माशी,मावा, फुलकिडे विविध प्रकारच्या आळयांचे देखिल नियंत्रण देखील चांगल्या प्रकारे होते. मोठ्या आळयांच्या नियंत्रणात निंबोळी अर्काची जास्त मदत होत नाही यासाठी अळी लहान अवस्थेत असतानाच निंबोळी अर्काची फवारणी करावी.

०७. निंबोळी अर्क किटकांवर बहुआयामी आंतरप्रवाही किटकनाशका प्रमाणे कार्य करतात.

आवश्यक माहिती :

०१. मे ते जुन महिन्यात कडूलिंबाच्या झाडावरून पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा आणि सावलीत वाळवा.

०२. ८ महिन्यापेक्षा जुन्या निंबोळ्या वापरू नका. कारण इतक्या जुन्या बियामध्ये आवश्यक ती किडनाशक शक्ती राहत नाही.

०३. नेहमी निंबोळ्याचा ताजा अर्क (NSKE) वापरा.

०४. योग्य परिणाम मिळण्यासाठी दुपारी ३.३० नंतर फवारणी करावी.